# ठाणे महानगरपालिका, ठाणे
## क्रिडा विभाग
## जाहिर सुचना

ठाणे महानगरपालिकेच्या तरणतलाव विभागाकरिता जलनिर्देशक/जलजिवरक्षक यांची कंत्राटी पध्दतीने मानधनावर नेमणुक करणेकरिता इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

ठाणे महानगरपालिकेच्या तरणतलाव विभागाकरीता कंत्राटी पद्धतीने मानधनावर०६ जलनिर्देशक/जलजिवरक्षक यांची तात्पुरत्या स्वरुपात ०६ महिन्याकरिता नेमणुक करण्यासाठी खालील अटी/शर्तीस अधीन राहुन अर्ज मागविण्यात येत आहेत.

**अटी/शर्ती**

१) सदर तरणतलाव विभागासाठी ०५ पुरूष जलनिर्देशक/जलजिवरक्षक व ०१ महिला जलनिर्देशक/जलजिवरक्षक निवड करण्यात येईल.

२) महाराष्ट्र राज्य शासनाने मान्यता दिलेल्या शिक्षण मंडळाची,उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण (H.S.C.)

३) राज्यस्तरीय / जिल्हास्थरीय अथवा तत्सम स्तरावरील स्पर्धेत सहभाग घेतल्याचे प्रमाणपत्र आवश्यक.

४) राष्ट्रीय / राज्य स्तरावरील पोहण्याच्या स्पर्धेत पदक (मेडल) धारण करण्याऱ्यास प्राधान्य.

५) शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था / खाजगी संस्थेकडील जलनिर्देशक / जलजिवरक्षक अथवा समकक्ष कामाचा किमान ०३ वर्षाचा अनुभव.

६) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.

७) जलनिर्देशक/जलजिवरक्षक यांची नियुक्ती शासनाने सुचीत केल्या प्रमाणे विहित नियमानुसार करार पध्दतीने असतील त्यांना सेवेत कायमस्वरुपी करण्यासाठी दावा करण्याचा हक्क राहणार नाही.

८) निवड झालेल्या जलनिर्देशक/जलजिवरक्षक यांना नियमीत सराव बॅचच्या वेळेत सराव घेण्याकरिता उपस्थित राहणे आवश्यक असेल.

९) जलनिर्देशक/जलजिवरक्षक यांची कार्यालयीन वेळ सकाळी ०६:०० ते सकाळी १०:०० व दुपारी ०४:०० ते रात्रौ ०८:०० असेल.

१०) निवड झालेल्या जलनिर्देशक/जलजिवरक्षक यांना प्रती महीना **रू.१४,०००/-** या प्रमाणे ठोक मासिक मानधन अदा करण्यात येईल.

११) निवड झालेल्या जलनिर्देशक/जलजिवरक्षक यांना मासिक मानधन व्यतिरिक्त महापालिकेच्या नियमित कर्मचाऱ्याप्रमाणे इतर कोणतेही हक्क, अधिकार लाभ, मिळणार नाहीत.

१२) सोमवार साप्ताहिक सुट्टी व्यतिरिक्त आपणांस कोणताही भत्ता, कायमपणाचे कोणतेही फायदे तसेच कोणत्याही प्रकारच्या रजेचा लाभ घेता येणार नाही.

१३) सदरची नियुक्ती कंत्राटी पद्धतीने ठोक मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात ०६ महिन्याकरिता असेल.

१४) सभासदांना सराव देता दरम्यान निवड झालेल्या जलनिर्देशक/जलजिवरक्षक यांना दुखापत झाल्यास त्यावरीत उपचार ठाणे महानगरपालिका रूग्णालयात मोफत करण्यात येईल.

१५) उपरोक्त प्रमाणे अर्हता धारण करणाऱ्या उमेदवाराच्या कागदपत्रांची छाननी निवड समिती मार्फत करून पात्र उमेदवाराच्या ठाणे महानगरपालिकेच्या तरणतलावावर ठाणे जिल्हा जलतरण संघटनेच्या प्रतिनिधी मार्फत जलतरणाची चाचणी घेण्यात येईल. त्या मधुन अंतिम जलनिर्देशक/जलजिवरक्षक यांची निवड करण्यात येईल.

१६) सदर पदाच्या ०६ महिन्याकरिता कंत्राटी पद्धतीने मानधनावर नेमणुकीकरिता पात्र उमेदवारास उपरोक्त अटी/शर्ती नुसार रू.१०० च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करणे बंधनकारक आहे.

१७) निवड झालेल्या जलनिर्देशक/जलजिवरक्षक जर अपेक्षित कामगिरी करत नसल्यास त्यांचा करारनामा रद्द करण्याचे अधिकार मा. आयुक्त सो. यांना असतील.

१८) सदरचे अर्ज दि.३०/०८/२०२३ पासुन दि.०८/०९/२०२३ पर्यंत स्विकारण्यात येतील, मुदतीनंतर आलेल्या अर्जांचा विचार करण्यात येणार नाही.

उपरोक्त प्रमाणे पात्रता धारण करणाऱ्या जलनिर्देशक/जलजिवरक्षक यांनी जलतरण संबंधित प्राविण्य प्रमापत्राच्या प्रमाणित छायांकित प्रतीसह खालील पत्यावर अर्ज सादर करावेत.

अर्ज करताना लिफाफ्यावर "जलनिर्देशक/जलजिवरक्षक" म्हणुन नेमणुक करणेकरिता त्या बाबत ठळक अक्षरात नमुद करावे.

**अर्ज करण्याचा कार्यालयाचा पत्ता:-**

**नागरी सुविधा केंन्द्र,**
**तळ मजला, प्रशासकिय भवन,**
**ठाणे महानगरपालिका, (मुख्यालय),**
**चंदनवाडी, पांचपाखाडी,**
**ठाणे. (प) ४००६०१**

(मिनल पालांडे)
प्र-उप आयुक्त (क्रिडा)
ठाणे महानगरपालिका, ठाणे